**कॅपिटल ॲडेक्वसीवरील महापरिपत्रक**
**अनुक्रमणिका**


| अनुक्रमांक | विषय |
|---|---|
| १ | प्रस्तावना |
| २ | अपरिहार्य असलेल्या आवश्यकता |
| ३ | कर्जाबाबत शेअर जोडणी |
| ४ | कॅपिटल ॲडेक्वसी मानके |
| ५ | भांडवलाचे व रिस्क ॲसेट्सचे गुणोत्तर (सीआरएआर) |
| ६ | भांडवली निधी |
| ७ | बाजार जोखमीसाठी भांडवल |
| ८ | भांडवली निधी वाढविण्याचे उपाय |
| ९ | रिटर्न्स |
| १० | जोडपत्र-१-सीआरएआर काढण्यासाठी जोखीम भार |
| ११ | जोडपत्र-२-रिटर्न्स |
| १२ | जोडपत्र-३-प्रिफरन्स शेअर्स देण्यावरील मार्गदर्शक तत्वे |
| १३ | जोडपत्र-४ दीर्घ मुदतीच्या ठेवी उभ्या करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे |
| १४ | परिशिष्ट |

## कॅपिटल ॲडेक्वसी

**प्रस्तावना**

आणीबाणीच्या प्रसंगी किंवा बँकेची कामगिरी निकृष्ट असल्यास भांडवल आघात प्रतिबंधकाचे काम करते. पुरेसे भांडवल असल्यामुळे ठेवीदारांमध्ये विश्वासही निर्माण होतो. त्यामुळे, पुरेसे भांडवल असणे हे नवीन बँकेला परवाना मिळाविण्यासाठी तसेच व्यवहारात सातत्य असण्यासाठी असलेली एक पूर्व-अट आहे.

**२ अपरिहार्य आवश्यकता**

बँकिंग रेग्युलेशन अधिनियमाच्या (एएसीएस) कलम ११ मधील तरतुदींनुसार बँकेचे भरणा-भांडवल व राखीव निधीचे एकूण मूल्य एक लक्ष रुपयांपेक्षा कमी असल्यास ती बँक सुरु करता येत नाही किंवा तिला व्यवहारही करता येऊ दिला जात नाही. ह्याशिवाय, वरील अधिनियमाच्या कलम २२(३) (३) खाली, एखादी प्राथमिक (नागरी) सहकारी बँक स्थापन करण्यासाठी, रिझर्व बँक, वेळोवेळी, किमान एंट्री पॉईंट भांडवल (एंट्री पॉईंट नॉर्म्स) विहित करत असते.

**कर्जांबाबत शेअर - जोडणी**

पारंपरिक पध्दतीत, प्राथमिक (नागरी) सहकारी बँका, त्यांचे शेअर भांडवल वाढविण्यासाठी, त्याची जोडणी सभासदांनी घेतलेल्या कर्जाशी करतात.
रिझर्व बँकेने शेअर जोडणीसाठी पुढील मानके विहित केली आहेतः-
१) कर्जे अप्रतिभूतित धर्तीवर असल्यास त्या कर्जाच्या ५ %
२) कर्जे प्रतिभूतित असल्यास त्या कर्जांच्या २.५ %
३) लघुउद्योगांनी घेतलेल्या प्रतिभूतियुक्त कर्जांसाठी, त्या कर्जांच्या २.५ % त्यापैकी १ % सुरुवातीलाच घ्यावयाचे आहे व उरलेले १.५ % पुढील २ वर्षांत गोळा करावयाचे आहे.

वरील शेअर जोडणीची मानके, बँकेच्या एकूण भरणा झालेल्या शेअर भांडवलाच्या ५ % एवढ्या, सभासदांच्या शेअर धारणाला लागु करता येईल. एखाद्या सभासदाकडे, एखादा युसीबीच्या एकूण भरणा - झालेल्या शेअर भांडवलाच्या ५ % एवढे शेअर्स आधीच असल्यास, विद्यमान शेअर - जोडणी मानकांनुसार, त्याला तिला अतिरिक्त शेअर्स घेण्याची आवश्यकता नाही. दुसऱ्या शब्दात, कर्जदार सभासद, विद्यमान शेअर - जोडणी अनुसार काढलेल्या रकमेएवढेच शेअर्स किंवा बँकेच्या एकूण भरणा झालेल्या शेअर भांडवलाच्या ५ % रकमेचे (ह्यातील जे कमी असेल ते) शेअर्स घेऊ शकतो.
कॅपिटल टु रिस्क वेटेड ॲसेटस रेशो ( सीआरएआर ) सातत्याने १२ टक्के एवढा ठेवणाऱ्या युसीबीनां, नोव्हेंबर १५, २०१० पासून विद्यमान शेअर लिंकिंग करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

**४ कॅपिटल ॲडेक्वसी मानके**

भांडवल पुरेसे असण्याबाबतचा पूर्वापार दृष्टिकोन, ताळेबंदामधील निरनिराळ्या ॲसेट्समधील जोखीम पैलू तसेच ताळेबंदाबाहेरील व्यापार हिशेबात धरत नाही व ॲसेटसच्या स्तरांशी भांडवलाची तुलना करु शकत नाही.
बँकिंग पर्यवेक्षणावरील *बेसेल समितीने, प्रथम बेसेल कॅपिटल ॲकॉर्ड (बेसेल १ फ्रेमवर्क ह्या नावाने विख्यात) जुलै १९८८ मध्ये प्रसिध्द केला असून, त्यात, आंतरराष्ट्रीय बँकिंग प्रणालीची सुदृढता व्यवस्थित ठेवण्यासाठी, तसेच आंतरराष्ट्रीय बँकांमधील स्पर्धात्मक असमानतेचा स्त्रोत कमी करण्यासाठी, किमान कॅपिटल ॲडेक्वसी विहित केली आहे. १९८८ च्या कॅपिटल ॲकॉर्डचे मूळ गुणविशेष खालील प्रमाणे आहेत :-

** बेसेल समिती ही २७ सभासद देशांमधील (बेल्जियम, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जापान, लक्सेंबर्ग, नेदरलँड्स, स्पेन, स्वीडन, स्विझरलंड, युनायटेड किंगडम, युएसए) बँक पर्यवेक्षकांची एक समिती आहे. अनेक पर्यवेक्षक प्राधिकरणांमध्ये आंतरराष्ट्रीय सहकार*

*आणण्यासाठी ती १९७४ मध्ये स्थापन करण्यात आली तिच्या सभा, बेसेल, स्विझरलंड येथील बँक ऑफ इंटरनॅशनल सेटलमेंट्स येथे घेतल्या जातात व तेथेच तिचे कायमस्वरुप कार्यालय आहे.*

१) १९९२ च्या अखेरीस ८% एवढी किमान भांडवली आवश्यकता
२) भांडवलाबाबत टियर दृष्टिकोनः-

- मूळ भांडवलः इक्विटीः इक्विटी, प्रकटीकृत राखीव निधी.
- पूरक भांडवलः सर्वसाधारण कर्ज हानि राखीव निधि, अन्य गुप्त राखीव निधी, पुनर्मूल्यांकन राखीव निधी, हायब्रिड भांडवली संलेख व दुय्यम कर्जे.
- ५०% भांडवल हे मूळ भांडवल समजले जावे.

३) बँकांच्या निरनिराळ्या एक्सपोझर वर्गांसाठी, ०% पासून १२७.५% पर्यंतचे जोडपत्र १ मध्ये दिल्यानुसार, त्या ॲसेटसच्या जोखमीवर अवलंबून असलेले जोखीम भार, व्यापारी कर्ज ॲसेटसवर१००% जोखीम भार ठेवला गेला होता तरी आंतर-बँकीग ॲसेटसचा २०% जोखीम भार होता आणि सॉव्हरिन पेपर्ससाठी तो ०% होता. २००२ मध्ये, जोखीम भारित ॲसेटसची टक्केवारी म्हणून भांडवली निधी ठेवणे सर्व युसीबींना लागु करण्यात आले. २००५ पासून, कॅपिटल टु रिस्क ॲसेट रेशो, किमान ९ टक्के ठेवला जाणे अपेक्षित आहे. ह्याशिवाय मूळ बेसेल ॲकॉर्डमधील दुरुस्तीनुसार, मार्केट संबंधित एक्सपोझर्ससाठी कॅपिटल चार्ज विहित करण्यात आला.

**भांडवली निधी**

४.१ येथे नोंद घेतली जावी की, कॅपिटल ॲडेक्वसी मानकांसाठी असलेल्या ''भांडवली निधी'' मध्ये, पुढील परिच्छेदांमध्ये वर्णन केल्याप्रमाणे, टियर १ व टियर २ असे दोन्हीही प्रकारचे भांडवल समाविष्ट आहे.

**टियर १ भांडवल**
टियर १ भांडवलात पुढील बाबी येतातः-
१) मतदानाचा अधिकार असलेल्या नियमित सभासदांकडून गोळा केले गेलेले भरणा झालेले भाग भांडवल.
२) सहकारी/नाममात्र सभासदांकडून, जेथे उपनियमांनुसार त्यांना शेअर्स देण्याची परवानगी आहे, आणि अशा शेअरांची निकासी करण्यावर नियमित सभासदांप्रमाणेच निर्बंध आहेत, गोळा केले गेलेले अंशदान (कॉंट्रिब्युशन)
३) नाममात्र व सहकारी सभासदांकडून गोळा केलेले अंशदान/परत न देण्याजोगे शुल्क, जे परत करावयाचे नसल्याने, एखाद्या सुयोग्य शीर्षकाखाली ''राखीव'' म्हणून वेगळे ठेवले जाते.
४) परपेच्युअल नॉन-क्युम्युलेटिव प्रिफरन्स शेअर्स (पीएनसीपीएस)
५) हिशेब तपासणी झालेल्या लेखांनुसार असलेले मुक्त राखीव निधी. स्थिर ॲसेट्सचे पुनर्मूल्यांकन केल्याने निर्माण झालेले किंवा बाहेरील दायित्व पूर्ण करण्यास निर्माण केलेले राखीव निधी हे टियर १ भांडवलात समाविष्ट केले जाऊ नयेत. मुक्त राखीव निधीमधून पुढील बाबी वगळण्यात आल्या आहेत -- भावी कर्ज-हानिसाठी, फसवणुकीं मुळे होणारी हानी, गुंतवणुकींमधील व इतर ॲसेट्समधील आणि बाहेरील दायित्वांमधील मूल्य ऱ्हास ह्यासाठी निर्माण केलेले सर्व राखीव निधी/तरतुदी. उदाहरणार्थ, ''इमारत निधी'' ह्या शीर्षकाखाली ठेवलेल्या रकमा ह्या, मुक्त राखीव निधीचा एक भाग म्हणून समजल्या जातील तर ''वाईट व शंकास्पद राखीव निधी'' वगळला जाईल.
६) ॲसेट्सच्या विक्रीमधून निर्माण झालेले व अतिरिक्त समजले गेलेले राखीव भांडवल (कॅपिटल रिझर्व)
७) इनॉव्हेटिव परपेच्युअल कर्ज संलेख *
८) प्रॉफिट ॲड लॉस अकाउंटमधील कोणतीहि अतिरिक्त रक्कम (नक्त), म्हणजे, देय लाभांश बाजूला काढल्यावर येणारी शिल्लक, शिक्षण निधी, उपयोगिता निश्चित केलेले अन्य निधी, असल्यास ॲसेट लॉस इत्यादि.

** इनॉव्हेटिव परपेच्युअल कर्ज संलेख देण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे, परिपत्रक युसीबी. पीसीबी. सीआयआर. क्र. ३९/०९.१६.९००/२००८-०९ दि. जानेवारी २३, २००९ च्या जोडपत्रात दिली आहेत.*

**सूचनाः-** १) अमूर्त तोट्याची रक्कम, चालु वर्षामधील आणि मागील कालांमधील पुढे आणलेला (ब्रॉट फॉरवर्ड) तोटा, एनपीए तरतुदींमधील तूट, अकार्यकारी ॲसेट्सवरील चुकीने धरलेले उत्पन्न, बँकेवर कोसळलेल्या जबाबदारीसाठी करावयाची तरतुद इत्यादि टियर-१ भांडवलातून वजा केले जातील.

२) टियर-१ भांडवलात एखाद्या निधीचा समावेश होण्यासाठी, त्या निधीने दोन निकष पूर्ण केले असले पाहिजेत. उदा - तो निधी नक्त नफ्याचे एक विनियोजन (ॲप्रोप्रिएशन) म्हणून निर्माण केलेला असावा आणि तो मुक्त राखीव निधी असावा - विशिष्ट राखीव निधी नसावा. तथापि, तो निधी, नफ्याचे विनियोजना ऐवजी त्या नफ्यावरील "चार्ज" म्हणून निर्माण केलेला असल्यास, तो निधी परिणामी एक तरतुद बनतो आणि तो खाली दिल्याप्रमाणे, केवळ टियर-२ भांडवल म्हणून ओळखला जाण्यास पात्र ठरेल व त्याला ॲसेट्सच्या १.२५ % एवढा जोखीम भार लागू होईल. मात्र असा जोखीम भार, एखाद्या ॲसेटच्या किंवा ज्ञात दायित्वाच्या मूल्यातील संभाव्य तोटा किंवा घट नसावा.

*३) परिपत्रक युबीडी, बीपीडी ( पीसीबी ) सीआयआर क्र. ४९/०९.१४.०००/- २०१०-११ दि. मे २४, २०११ अनुसार, पेमेंट ऑफ ग्रॅच्युइटि आधिनियम १९७२ मधील दुरुस्तीनुसार, ग्रॅच्युइटीच्या मर्यादात वाढ झाल्यामुळे काही डिफर्ड खर्च झाला असल्यास, तो युसीबींच्या टायर -१ भांडवलामधून कमी केला जाणार नाही.*

**टियर-२ भांडवल**

टियर भांडवलात पुढील बाबी समाविष्ट आहेतः-

**अप्रकटीकृत राखीव निधी**

**४.२.१**

ह्यांचे गुणविशेष बहुशः इक्विटी व प्रकटीकृत राखीव निधीसारखे असतात. ह्यांच्यामध्ये अनपेक्षित तोटे सामावून घेण्याची क्षमता असून, ते साठलेला नफा दर्शावित असल्यास व एखाद्या ज्ञात दायित्वामुळे त्यावर परिणाम होत नसल्यास त्यांचा भांडवलात समावेश केला जाऊ शकतो आणि त्यांचा उपयोग सर्वसाधारण तोटा किंवा कार्यकारी तोटा सामावून घेण्यासाठी केला जाऊ नये.

**पुनर्मूल्यांकन राखीव निधी**

**४.२.२**

ह्या प्रकारचे राखीव निधी बहुशः अनपेक्षित तोट्यांविरुध्द रोधकाचे काम करतात. परंतु ते स्वभावतः कमी प्रमाणात कायमस्वरुपी असून त्यांना "कोअर भांडवल" म्हणता येत नाही. बँकेच्या पुस्तकातील न्यूनमूल्यांकित ॲसेट्सचे पुनर्मूल्यांकन केल्याने पुनर्मूल्यांकन राखीव निधी निर्माण होतात. ह्याबाबतचे विशेष उदाहरण म्हणजे बँकेची इमारत/जागा आणि पणनीय प्रतिभूती. अनपेक्षीत तोट्यांसाठी रोधक म्हणून हे राखीव निधी कोढपर्यंत काम करु शकतील हे, संबंधित ॲसेट्सच्या बाजार मूल्यांच्या अंदाजांवर कोढपर्यंत ठेवता येतील ह्याच्या निश्चिततेवर, कठीण बाजार परिस्थितीत किंवा नाइलाजाने विकण्यातील त्यांच्या मूल्य ऱ्हासावर, ही मूल्ये प्रत्यक्ष वसूल करण्याच्या संभाव्यातेवर, पुनर्मूल्यांकन केल्यामुळे येणाऱ्या कर-जबाबदाऱ्या इत्यादींवर अवलंबून असते. ह्यासाठी, टियर-२ भांडवलात समावेश करण्यासाठी त्यांचे मूल्य ५५% सूट धरुन समजणे योग्य ठरेल - म्हणजे, पुनर्मूल्यांकन राखीव निधीची ४५% रक्कमच टियर-२ भांडवलात समाविष्ट धरली जावी. असे राखीव निधी, ताळेबंदावर, पुनर्मूल्यांकन राखीव निधी म्हणून दाखविले जावेत.

**सर्वसाधारण तरतुदी लॉस रिझर्वज्**

**४.२.३**

ह्यामध्ये, कोणत्याही ज्ञात संभाव्य तोट्यासाठी नसलेल्या किंवा एखाद्या ॲसेटच्या मूल्यात घट झाल्यास होणाऱ्या किंवा ज्ञात जबाबदारीबाबतच्या, बँकेच्या पुस्तकात आढणाऱ्या सर्वसाधारण तरतुदींसाठी कोणत्याही रकमेचा विचार करतेवेळी, ज्ञात असलेल्या सर्व तोट्यांसाठी आणि दिसू शकणाऱ्या संभाव्य तोट्यांसाठी पुरेशा तरतुदी केल्या गेल्या आहेत ह्याची खात्री करुन घेतली जावी. उदाहरणार्थ - ह्या वर्गीकरणाखाली समाविष्ट करण्यासाठी, स्टॅंडर्ड ॲसेट्ससाठी सर्वसाधारण तरतुद, एनपीएची विक्री करण्यावर अतिरिक्त तरतुद

इत्यादींचा विचार करण्यात यावा. टियर-२ भांडवलात समाविष्ट करावयाच्या अशा तरतुदी एकूण जोखीम भार-ॲसेट्सच्या १.२५% करण्यास परवानगी आहे.

विद्यमान सूचनांच्या अनुसार, प्रुडेंशियल नॉर्म्सनुसार एनपीएंसाठी केलेल्या तरतुदी, निव्वळ एनपीएची रक्कम काढण्यासाठी, एकूण एनपीएच्या रकमेतून वजा केल्या जातात. निरनिराळ्या प्रकारच्या तरतुदीसाठीच्या प्रुडेंशियल रीती व कॅपिटल ॲडेक्वसीसाठी त्यावरील प्रक्रिया खाली दिल्या आहेत –

अ) **<u>अतिरिक्त सर्वसाधारण तरतुद (तरत्या तरतुदी )</u>**

बुडित कर्जांसाठीच्या अतिरिक्त सर्वसाधारण तरतुदी ( म्हणजे कोणत्याही विशिष्ठ कर्ज-बुडितासाठी (एनपीए) राखून ठेवलेल्या ) ग्रॉस एनपीएचे निव्वळ मूल्य काढण्यासाठी किंवा टायर-२ भांडवलात समाविष्ठ करण्यासाठी वापरल्या जाऊ शकतात परंतु दोन्हीही बाबतीत नाही.

ब) **<u>विहित दरापेक्षा अधिक दराने एनपीएसाठी केलेल्या अतिरिक्त तरतुदा</u>**

प्रुडेंशियल नॉर्म्सखाली विहित केलेल्या तरतुदीपेक्षा अधिक तरतुदी, बँका , जेव्हा एनपीएसाठी खास करतात, तेव्हां निव्वळ एनपीएची रक्कम कळविते वेळी, एकूण एनपीएच्या रकमेमधून अशी खास तरतुद वजा केली जावी. बँकेने केलेली अशी खास अतिरिक्त तरतुद टायर-२ भांडवल समजली जाणार नाही.

क) **<u>एनपीएच्या विक्रीवरील अतिरिक्त तरतुद</u>**

एनपीएची विक्री झाल्यास व विक्रीचे उत्पन्न त्या ॲसेटच्या पुस्तकी मूल्य ठेवलेल्या निव्वळ तरतुदी ह्यापेक्षा अधिक असल्यास, तरतुदीची अतिरित्त रक्कम ही नफा-तोटा लेखेमध्ये परत लिहिली जाऊ नये. उदा. – १००,०००/- च्या एनपीएसाठी बँकेने रु. ५०,०००/- ची (म्हणजे ५०%) तरतुद ठेवली आहे. तो ॲसेट रु. ७०,०००/- ला विकला गेल्यास रु. ३०,०००/- चा तोटा होईल व तो रु. ५०,०००/- च्या तरतुदीविरुद्ध समावून घेतला जाईल व त्या एनपीएच्या विक्रीमुळे रु. २०,०००/- ची अतिरिक्त तरतुद तयार होईल. अशा अतिरिक्त तरतुदी ''तरतुदी'' खाली दाखविणे सुरुच ठेवले जावे व त्या जोखीम भारित ॲसेटसच्या सर्वसमावेशक १.२५% मर्यादेमध्ये असल्यास त्यांना टायर-२ भांडवल समजले जावे.

ड) **<u>फेअर व्हॅल्यु कमी झाल्यास करावयाच्या तरतुदा</u>**

परिपत्रक युबीडी, पीसीव्ही, बीपीडी, क्र. ५३ दि. मार्च ६, २००० च्या परिच्छेद ५.१ अनुसार बँकांना सांगण्यात आले होते की त्यांनी विद्यमान तरतुदीकरणाच्या नॉर्म्सनुसार पुनर्रचित अग्रिम राशींसाठी तरतुदी ठेवाव्यात. अशा तरतुदींच्या अतिरित्त, बँकांना सांगण्यात आले होते की त्यांनी, व्याजदर कमी केल्यामुळे किंवा अशा पुनर्रचित कर्जाच्या मुद्दल रकमेच्या परतफेडीचे नवे वेळापत्रक केल्यामुळे होणाऱ्या तोट्यासाठी तरतुदी कराव्यात. पुनर्रचित अग्रिम राशींच्या फेअर व्हॅल्यु कमी झाल्यामुळे केलेल्या अतिरिक्त तरतुदी ( स्टँडर्ड ॲसेटस व एनपीए दोन्हीही साठी ) संबंधित लोन ॲसेटमधून नेटेड करण्यासाठी परवानगी आहे.

**गुंतवणुकीतील चढउतारांसाठी राखीव निधी**

**४.२.४**

बँकेच्या गुंतवणुकीतील चढउतारांसाठी असलेल्या राखीव निधीमध्ये असलेली शिल्लक (असल्यास)

**हायब्रिड कर्ज भांडवल संलेख**

**४.२.५**

ह्या वर्गात अनेक भांडवली संलेख असून त्यात इक्विटीचे काही गुणविशेष व कर्जाचे विशिष्ट गुणविशेष असतात. ह्या प्रत्येकमध्ये असे एक विशिष्ट लक्षण असते व त्यामुळे ते भांडवल म्हणून मात्र ठरत नाही. जेथे अशा संलेखांचा, विशेषतः, तरलता येऊ न देता, सातत्यने तोटा न होऊ देता, इक्विटीशी सारखेपणा असतो, तेथे त्यांचा समावेश टियर-२ भांडवलात करता येईल. हे संलेख पुढिलप्रमाणे आहेतः-

१) टियर २ प्रिफरन्स शेअर्स

जोडपत्र ३ मधील विद्यमान सूचनांचे पालन केले गेले असल्यास, प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांना, परपेचुअल क्युम्युलेटिव प्रिफरन्स शेअर्स (पीसीपीएस), रिडीमेबल नॉन क्युम्युलेटिव प्रिफरन्स शेअर्स (आरएनसीपीएस), आणि रिडीमेबल क्युम्युलेटिव प्रिफरन्स शेअर्स (आरसीपीएस) द्यावयाची परवानगी आहे.

२) दीर्घ मुदतीच्या ठेवी (एलटीडी), निम्नस्तरीय टियर २ भांडवल समजल्या जातील.

२) **<u>दीर्घ मुदतीच्या (सबॉर्डिनेटेड ) ठेवी</u>** : ५ वर्षापेक्षा कमी नसलेल्या किमान काळासाठी मुदत ठेवी उभ्या करण्यास युसीबींना परवानगी आहे व त्या लोअर टायर-२ भांडवल म्हणून समजल्या जाण्यास पात्र आहेत. ह्याबाबतची सविस्तर मार्गदर्शक तत्वे जोडपत्र ४ मध्ये दिली आहेत.

सहकारी सोसायट्या अधिनियमाच्या खाली त्या युसीबीज पंजीकृत झाल्या आहेत. त्यांच्या पोटनियमांचे/तरतुदींचे पालन केले गेले असल्यास, आणि सहकारी सोसायटीचे रजिस्ट्रार/केंद्रीय रजिस्ट्रार ह्यांच्या मंजुरीने, त्या युसीबी, प्रिफरन्स शेअर्स व दीर्घ मुदतीच्या ( सबॉर्डिनेटेड ) ठेवी देऊ शकतात.

**सबॉर्डिनेटेड डेट्रस (गौण कर्जे)**

**४.२.६**

टियर २ भांडवलात समावेश होण्यासाठी, तो संलेख, संपूर्ण भरणा झालेला, अप्रतिभूतित, इतर कर्जदारांच्या दाव्यांच्या तुलनेत दुय्यम (सबॉर्डिनेटेड) असलेला, निर्बंधक कलमांपासून मुक्त असलेला, आणि धारकाने पुढाकार घेतल्याने किंवा बँकेच्या पर्यवेक्षकीय प्राधिकरणाच्या अनुमतीशिवाय विमोचनीय नसावा. त्यांना बहुशः एक निश्चित अशी परिपक्वता असते. आणि जसजशी परिपक्वता जवळ येत जाईल त्यानुसार, टियर २ भांडवलात त्यांचा समावेश करण्यासाठी त्यावर वर्धमान डिस्काउंट दिला जावा. ५ वर्षापेक्षा कमी परिपक्वता असलेल्या किंवा उर्वरित परिपक्वता १ वर्षाची असलेल्या संलेखांचा टियर २ भांडवलाचा एक भाग म्हणून समावेश केला जाऊ नये. सबॉर्डिनेटेड कर्ज संलेख, टियर १ भांडवलाच्या ५०% पर्यंतच सीमित असतील.

**इतर अटी**

**४.३**

येथे नोंद घेतली जावी की, मानकांचे (नॉर्म्स) पालन करण्याबाबत, टियर २ च्या घटकांची बेरीज, टियर १ च्या घटकांच्या बेरजेच्या जास्तीत जास्त १००% एवढी सीमित असेल. बँकांना, त्यांचे टियर १ भांडवल उभे करण्यास वेळ देण्यासाठी, विहित ९% पेक्षा कमी सीआरएआर असलेल्या बँकांना मार्च ३१, २०१३ पर्यंत हे निर्बंध रोखून ठेवण्यात आले आहेत. दुसऱ्या शब्दात, बँके जवळ टियर १ भांडवल नसले तरीही, कॅपिटल ॲडेक्वसीसाठी, टियर २ भांडवल हा भांडवली निधी समजला जाईल. तथापि, ह्या कालावधीत, कॅपिटल ॲडेक्वसीच्या आवश्यकतांसाठी केवळ निम्न टियर २ भांडवल विहित सीआरएआरच्या ५०% एवढे सीमित असेल आणि टियर २ भांडवलासंबंधीचा वर्धमान डिस्काउंट लागु होईल.

**५. बाजार जोखमीसाठी भांडवल**

५.१

बाजार जोखमींसाठी स्पष्ट असा भांडवली चार्ज उपलब्ध करण्याबाबत सर्वसमावेशक अशी मार्गदर्शक तत्वे आहेत. बाजार जोखीमची व्याख्या म्हणजे, बाजार मूल्यामधील चढ उतारांमुळे, ताळेबंदामधील व ताळेबंदाबाहेरील तोट्यांसंबंधीची जोखीम/धोका. भांडवली चार्ज देण्यासाठी बाजार जोखमींची स्थिती खालीलप्रमाणे आहेः-

- व्याजदर संबंधीचे संलेख व ट्रेडिंग बुकामधील इक्विटी ह्यासंबंधीच्या जोखमी/धोके

- संपूर्ण बँकेमधील (बँकिंग व ट्रेडिंग बुके दोन्हीही) विदेशी मुद्रा जोखीम (मूल्यवान धातूंमधील ओपन पोझिशन धरुन).

५.२

बाजार जोखमींसाठी भांडवली आवश्यकता विहित करण्याचे प्रथम पाउल म्हणून, गुंतवणुकींवर २.५ टक्के एवढा अतिरिक्त भार लावण्यास युसीबींना सांगण्यात आले होते. तथापि येथे नोंद घेतली जावी की, जोडपत्रात विहित केलेल्या जोखीम भारामध्ये अतिरिक्त जोखीमभार समाविष्ट करण्यात आले आहेत. आणि बँकांना त्यासाठी वेगळी तरतुद करण्याची आवश्यकता नाही.

५.३

एडी वर्ग - १ परवाना असलेल्या युसीबींना, एप्रिल १, २०१० पासून मार्केट रिस्कसाठी भांडवल उपलब्ध करणे आवश्यक आहे. अशा मार्केट रिस्कसाठी असलेल्या भांडवली आकाराबाबतची मार्गदर्शक तत्वे, परिपत्रक युबीडी, बीपीडी ( पीसीबी ) सीआयआर क्र. ४२/०९.११.६००/२००९-१० दि. फेब्रु ८, २०१० मध्ये दिली आहेत.

**रिटर्न्स (अहवाल)**

बँकांनी संबंधित प्रादेशिक कार्यालयांकडे पुढील बाबींचा नोर्देश करणारे वार्षिक अहवाल पाठवावेत--१) भांडवली निधी २) ऑफ-बॅलन्स शीट/नॉन-फंडेड एक्स्पोझर्सचे रुपांतरण ३) रिस्क वेटेड ॲसेट्सबाबत आकडेमोड ४) भांडवली निधी आणि रिस्क ॲसेट रेशो काढण्याबाबतची आकडेमोड. ह्या अहवालांवर, रिझर्व बँकडे पाठवावयाच्या अनिवार्य अहवालावर सही करण्यास प्राधिकृत असलेल्या दोन अधिकाऱ्यांच्या सह्या असाव्यात.

| | |
|---|---|
| **प्रुडेन्शियल नॉर्म्स - सीआरएआर काढण्यासाठी जोखीम-भार**<br>**(परिच्छेद ४.३ अनुसार)** | |
| १. देशांतर्गत व्यवहार | |
| अ) फंडेड रिस्क ॲसेट्स | |
| **ॲसेटच्या बाबी** | **जोखीमभार** |
| १. **शिल्लक** | |
| १) (विदेशी मुद्रेतील नोटांसह) आरबीआयकडे शिल्लक असलेली रोख रक्कम | ० |
| २) युसीबीज् मधील चालु खात्यातील शिल्लक | २० |
| ३) इतर बँकांच्या चालु खात्यांमधील शिल्लक | २० |
| **२) गुंतवणुकी** | |
| १) सरकारी प्रतिभूतींमधील गुंतवणुक | २.५ |
| २) केंद्र/राज्य सरकारांनी हमी देलेल्या इतर मंजुरीप्राप्त प्रतिभूतींमधील गूंतवणुक | २.५ |
| ३) व्याज प्रदान आणि मुदलाची परतफेड ह्याबाबत केंद्र सरकारने हमी दिलेल्या इतर प्रतिभूतींमधील गुंतवणुक. (ह्यात इंदिरा/किसान विकासपत्रांमधील गुंतवणुक व केंद्र/राज्य सरकारांनी व्याजप्रदान व मुदलाची परतफेड ह्यासाठी हमी दिली आहे अशी गुंतवणुक समाविष्ट आहे). | २.५ |
| ४) व्याजप्रदान व मुदलाची परफेड ह्याबाबत राज्य सरकारने हमी दिली आहे अशा प्रतिभूतींमधील गुंतवणुक. | २.५ |
| सूचनाः व्याजप्रदान व मुदलाची परतफेड ह्याबाबत राज्य सरकारने हमी दिली आहे, व जी अकार्यकारी गुंतवणुक झाली आहे, अशा प्रतिभूतींमधील गुंतवणुकींना १०२.५ टक्के एवढा जोखीमभार लागु होईल (मार्च ३१, २००६ पासून) | |
| ५) केंद्र/राज्य सरकारने, व्याजप्रदान व मुदलाची परतफेड ह्याबाबत हमी दिली आहे अशा इतर मंजुरीप्राप्त प्रतिभूतींमधील गुतवणुक | २२.५ |
| ५) मंजुरी प्राप्त बाजार कर्ज कार्यक्रमाचा एक भाग नसलेली, सरकारी उपक्रमांच्या सरकारने मंजुरी दिलेल्या प्रतिभूतींमधील गुंतवणुक | २२.५ |
| ६) (अ) स्थिर ठेवी, ठेवींची प्रमाणपत्रे इत्यादीबाबत, वाणिज्य बँका, जिल्हा केंद्रीय सहकारी बँका आणि राज्य सहकारी बँकांवरील दावे.<br>(ब) मुदत/स्थिर ठेवी इत्यादींसारखे, नागरी सहकारी बँकांवरील दावे. | २० |
| ७) अखिल भारतीय सार्वजनिक वित्तीय संस्थांनी दिलेल्या बाँड्समधील गुंतवणुक. | १०२.५ |

| | |
|---|---|
| ८) सार्वजनिक वित्तीय संस्थांनी त्यांच्या टियर २ भांडवलासाठी दिलेल्या बॉंड्समधील गुंतवणुक. | १०२.५ |
| ९) इतर सर्व गुंतवणुकी.<br>सूचना- अमूर्त ॲसेट्स व टियर १ भांडवलामधून वजा केलेला तोटा ह्यांना शून्य भार दिला जावा. | १०२.५ |
| १०) "डब्ल्यु आय" प्रतिभूतिमधील ऑफ बॅलन्सशीट (निव्वळ) स्क्रिप-निहाय स्थिती | २.५ |
| **३ कर्जे व अग्रिमराशी** | |
| १) खरेदी केलेली व डिसकाउंट केलेली बिले ह्यासह कर्जे व अग्रिम राशी आणि भारत सरकारने हमी दिलेल्या इतर कर्ज सुविधा | ० |
| २) राज्य सरकारने हमी दिलेली कर्जे. | ० |
| ३) अकार्यकारी झालेली (३१.०३.०६ पासून), राज्य सरकारने हमी दिलेली अग्रिमराशी | १०० |
| ४) भारतसरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांना दिलेली कर्जे | १०० |
| ५) रियल इस्टेट एक्सपोझर (जोखीम)<br>अ) गहाणवट ठेवेलेले व्यक्तिगत गृह कर्जः<br>• रु ३०. लाख पर्यंत (एलटीव्ही रेशो *= किंवा < ७५%)<br>• रु ३० लाखांपेक्षा अधिक (एलटीव्ही रेशो = किंवा < ७५%)<br>• कर्ज रक्कम कितीही असल्यास (एलटीव्ही रेशो = किंवा < ७५%)<br>ब) व्यापारासाठी रियल इस्टेट<br>क) सहकारी/गृह सोसायट्यांचा गट व गृहमंडळ आणि अन्य कोणत्याही कामासाठी | <br><br>५०<br>७५<br>१००<br>१००<br>१ |
| ** एल टीव्ही रेशो म्हणजे, त्या खात्यामधील एकूण येणे असलेल्या रकमांची टक्केवारी (उदा- "मुदल + उपवर्जित व्याज + त्या कर्जाबाबतचे इतर आकार") ही अंशामध्ये, आणि बँकेकडे गहाण ठेवलेल्या रहिवासी मालमत्तेचे वसुली होण्याजोगे मूल्य छेदान ठेवून मिळालेले गुणोत्तर* | |
| ६) फुटकळ कर्जे व अग्रिम राशी<br>अ) वैय्याक्तिक कर्जासह ग्राहकाला दिलेले कर्ज ------------------------------------<br>ब) सोने चांदीच्या दागिन्यांवर रु १ लाखपर्यंत दिलेले कर्ज --------------------------<br>क) शैक्षणिक कर्जासह इतर सर्व कर्जे व अग्रिमराशी --------------------------------<br>ड) शेअर्स/डिबेंचर्सच्या प्राथमिक/गहाणवट प्रतिभूतींविरुध्द दिलेली कर्जे -------------- | <br>१२५<br>५०<br>१००<br>१२७.५ |
| ७) लीजड ॲसेट्स<br>अ) हायर-परचेस/लीजिंग व्यवहारात असलेल्या व आता ॲसेट फायनान्स कंपनीज् असे वर्गीकरण केलेल्या एनबीएफसीना पात्र अशा कार्यकृतींसाठी दिलेली कर्जे व अग्रिमराशी<br>ब) हायर-परचेस/लीजिंग व्यवहारातील, ठेवी न स्वीकारणाऱ्या सिस्टमॅटिकली इंपॉर्टंट अबँकीय वित्तकंपन्यांना (एनबीएफसी-एनडी-एसआय) पात्र अशा कार्यकृतींसाठी दिलेली कर्जे व अग्रिमराशी. | <br>१००<br><br>१२५ |
| ८) डीआयसीजीसी/ईसीजीसी खाली दिलेल्या अग्रिमराशी---------------------------<br>सूचनाः- ५०% हा जोखीमभार हमी दिलेल्या रकमेपुरताच सीमित असावा-<br>खात्यामधील येणे असलेल्या सर्व रकमेवर नसावा. दुसऱ्या शब्दात, हमी दिलेल्या रकमेच्या वर/अतिरिक्त येणे रकमेवर १००% जोखीमभार लागु होईल. | ५० |
| ९) जेथे पुरेसे मार्जिन उपलब्ध आहे तेथील मुदत ठेवी, जीवन विमा पॉलिसी, एनएससीज्, आयव्हीपी व केव्हीपी ह्याबाबतच्या अग्रिमराशी. | ० |
| १०) सुपर-ॲन्युएशन लाभांखाली, बँक कर्मचाऱ्यांना दिलेली व फ्लॅट/घर गहाण ठेवून दिलेली कर्जे | २० |

| | |
|---|---|
| *सूचनाः- जोखीमभार, ठरविण्यासाठी, एखाद्या कर्जदाराची एकूण फंडेड व नॉन फंडेड जोखीम काढताना, बँका त्या कर्जदाराच्या येणे असलेल्या जोखमीविरुध्द ''नेट-ऑफ'' करु शकतात.* | |
| अ) रोख मार्जिन किंवा ठेंवीच्या गहाणवटीवर दिलेल्या अग्रिम राशी | |
| ब)कर्जदाराच्या चालु किंवा अन्य खात्यामधील विशिष्ट उद्देशासाठी न ठेवलेल्या व कोणतेही लिएन नसलेल्या जमा शिल्लकी | |
| क) घसारा किंवा बुडित कर्जांसाठी तरतुदी केल्या गेल्या आहेत अशा कोणत्याही ॲसेट्स संबंधाने | |
| ड) डीआयसीजीसी/ईसीजीसी ह्यांच्याकडून आलेले व वेगळ्या खात्यात घातलेले व संबंधित खात्यामधील थकित बाकी विरुध्द त्यांची तडजोड न होऊ शकल्याने प्रलंबित असलेले दावे. | |
| **४) इतर ॲसेट्स** | |
| १) इमारत/जागा, फर्निचर व फिक्सचर्स | १०० |
| **२) इतर ॲसेट्स** | |
| १) सरकारी प्रतिभूतींवरील येणे असलेले व्याज | ० |
| २) आरबीआयकडे ठेवलेल्या सीआरआर शिल्लकींवरील उपवर्जित व्याज | ० |
| ३) कर्मचाऱ्यांना दिलेल्या कर्जांवरील येणे असलेले व्याज | २० |
| ४) बँकांकडून येणे असलेले व्याज | २० |
| ५) इतर सर्व ॲसेट्स | १०० |
| **५ खुल्या स्थितीवरील बाजार-जोखीम** | |
| १) विदेशी मुद्रेच्या खुल्या स्थितीवरील बाजार जोखीम (प्राधिकृत डीलर्सनाच लागु) | १०० |
| २) सोन्याच्या खुल्या स्थितीवरील बाजार जोखीम | १०० |

**ब) ताळेबंदाबाहेरील (ऑफ बॅलन्स शीट) बाबी**

ताळेबंदाबाहेरील बाबींना असलेली क्रेडिट रिस्क एक्स्पोझर काढण्यासाठी, प्रथम खालील कोष्टकात दिलेल्या ''ऋण रुपांतर घटकाने'', ताळेबंदाबाहेरील प्रत्येक बाबीच्या दर्शनी मूल्याला गुणले जाते. ह्याला त्यानंतर, संबंधित काउंटर पार्टीला खाली दिलेल्या भाराने पुनश्च गुणले जाते.

| **अनुक्रमणिका** | **संलेख** | **ऋण रुपांतर घटक (%)** |
|---|---|---|
| १ | डायरेक्ट क्रेडिट सबस्टिटयुट्स. उदा. कर्ज असल्याबाबतच्या (इनडेटेडनेस) सर्वसाधारण हमी. ( कर्जे व प्रतिभूतींसाठी वित्तीय हमीचे काम करणाऱ्या स्टँड एलसीसह) आणि स्वीकारलेले (ॲक्सेप्टन्सेस) संलेख (कॅरॅक्टर ऑफ ॲक्सेप्टन्स असलेल्या एंडॉर्समेंट सह) | १०० |
| २ | विशिष्ट व्यवहार-संबंधित आकस्मिक बाबी (उदा. विशिष्ट व्यवहारांशी संबंधित हमी व स्टँडबाय एलसीज् | ५० |
| ३ | लघुमुदतीच्या स्व-निर्धारणक्षम (सेल्फ लिक्विडेटिंग) व्यापार-संबंधित आक्स्मिक बाबी (उदा. अंडरलायिंग शिपमेंट्स द्वारा गहाणवट ठेवलेल्या कर्जांची कागदपत्रे (डॉक्युमेंटरी क्रेडिट्स)) | २० |
| ४ | विक्री व पुनर्खरेदीचे करारनामे आणि जेथे कर्ज जोखीम बँकेवरच येते अशी रिकोर्ससह केलेली ॲसेट्सची विक्री | १०० |
| ५ | फॉरवर्ड ॲसेट खरेदी, फॉरवर्ड डिपॉझिट, आणि अंशतः प्रदान केलेले शॅम्स व प्रतिभूती, जेथे काही ड्रॉ डाउन बरोबर दायित्व दर्शविले जाते. | १०० |

| | | |
|---|---|---|
| ६ | नोट इश्युईंग सुविधा आणि फिरत्या अंडर-रायटिंग सुविधा | ५० |
| ७ | इतर दायित्वे (उदा. फॉर्मल स्टँडबाय सुविधा व क्रेडिट लाईन्स) जी एक वर्षापेक्षा अधिक मूळ परिपक्वता असलेली आहेत. | ५० |
| ८ | मूळ परिपक्वता एक वर्षाची असलेली अशा प्रकारची किंवा कोणत्याही वेळी विना अट रद करता येण्यासारखी दायित्वे | ० |
| ९ | १) इतर बँकांच्या प्रति-हमीविरुध्द बँकांनी दिलेल्या हमी | २० |
| | २) बँकांनी स्वीकारलेल्या बिलांच्या कागदपत्राचे बँकांद्वारे रिडिस्काउंटिंग. बँकांनी डिस्काउंट केलेली व इतर बँकेने स्वीकारलेली बिले बँकेवरील फंडेड क्लेम समजल्या जाईल. | २० |
| | *सूचनाः- अशा बाबतीत बँकांचे पूर्ण समाधान झालेले असावे की प्रत्यक्षात ते रिस्क एक्सपोझर दुसऱ्या बँकेवरच आहे. एलसीखाली खरेदी केलेली/डिसकाउंट केलेली/ निगोशिएट केलेली बिले (जेथे लाभार्थीला केलेले प्रदान हे "अंडर रिझर्व" खाली केले जात नाही) ही एलसी देणाऱ्या बँकेवरील जोखीम समजली जाईल- कर्जदारावरील नव्हे. कॅपिटल अडेक्वसीसाठी, वर दिलेल्या सर्व स्वच्छ निगोशिएन्सना, आंतर बँकीय जोखमींना लागु असलेले जोखीमभार लावले जातील. "अंडर रिझर्व" असलेल्या निगोशिएशन्स बाबत, ही जोखीम कर्जदारावर असल्याचे समजले जाईल व त्यानुसार जोखीमभार लावला जाईल.* | |
| १० | पुढील प्रमाणे असलेले मूळ परिपक्वता असलेले विदेशी मुद्रेचे, येणे असलेले एकूण करार -<br>१४ कॅलेंडर दिवसांपेक्षा कमी असलेले-------------------<br>१४ दिवसांपेक्षा अधिक पण एक वर्षापेक्षा कमी-----------<br>अतिरिक्त प्रत्येक वर्ष किंवा त्यांच्या भागासाठी----------- | <br><br>०<br>२<br>३ |
| | *सूचनाः जोखमीभार ठरविण्यासाठी, एखाद्या कर्जदाराचे एकूण फंडेड व नॉनफंडेड एक्सपोझर काढताना, बँका, खास विशिष्ट उद्देशासाठी न ठेवलेल्या व कोणत्याही लिएन पासून मुक्त असलेल्या चालु किंवा इतर खात्यामधील जमा असलेल्या शिल्लकेविरुध्द, त्या कर्जदाराच्या एकूण येणे रकमेबाबतच्या जोखमीचे "नेट ऑफ" करु शकतात.<br>वर दिल्याप्रमाणे रुपांतरण घटक लागु केल्यानंतर, अशा तडजोड केलेल्या ताळेबंदाबाहेरील मूल्याला, संबंधित प्रतिपक्षाला लागु असणाऱ्या भाराने पुनः गुणावे.* | |

*सूचनाः सध्या प्राथमिक नागरी सहकारी बँका ताळेबंदाबाहेरील बहुतेक व्यवहार करु शकणार नाहीत. तथापि, त्यांची विस्तार क्षमता पाहता, ताळेबंदाबाहेरील निरनिराळ्या बाबींसमोर जोखीमभार दाखविण्यात आले आहेत व कदाचित हे व्यवहार प्राथमिक नागरी सहकारी बँका भविष्यात करु शकतील.*

**२) बँकांच्या विदेशातील व्यवहारांबाबत अतिरिक्त जोखीमभार (फक्त प्राधिकृत डीलर्स साठी)**

**१) विदेशी मुद्रा आणि व्याजदर संबंधित करार**

१) विदेशीमुद्रा करारांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे -

अ) (क्रॉस करन्सी) आंतर-मुद्रा व्याजदर- अदलाबदल (स्वॅप्स)

ब) फॉरवर्ड विदेशी मुद्रा करार

क) मुद्रांबाबतचे भविष्यकाल

ड) अशाच प्रकारचे इतर करार

२) ताळेबंदाबाहेरील इतर बाबींप्रमाणेच, खाली दिल्यानुसार दोन टप्प्यांची आकडेमोड लागु होईल -

अ)पायरी-१-प्रत्येक संलेखाच्या राष्ट्रीय मुद्दल रकमेला (नॅशनल प्रिन्सिपल अमाउंट) खाली दिलेल्या रुपांतरण घटकाने गुणले जाते -

| मूळ परिपक्वता | रुपांतरण घटक |
|---|---|
| एक वर्षापेक्षा कमी | २% |
| एक वर्ष आणि दोन वर्षापेक्षा कमी | ५% (म्हणजे २% + ३%) |
| प्रत्येक अतिरिक्त वर्षासाठी | ३% |

ब) पायरी २ः अशा प्रकारे मिळालेल्या मूल्याला, वरील १-अ मधील संबंधित प्रतिपक्षाला दिलेल्या जोखमी भाराने गुणले जाते.

२) व्याजदर करार

३) व्याजदर करारात पुढील गोष्टींचा समावेश होतो -
अ) एकमेव मुद्रा व्याजदर अदलाबदली
ब) पायाभूत अदलाबदली (बेसिक स्वॅप्स)
क) फॉरवर्ड रेट ॲग्रीमेंट्स
ड) व्याजदर भविष्ये
इ) खरेदी केलेले व्याजदर पर्याय
फ) अशाच प्रकाचे इतर करार

४) ताळेबंदाबाहेरील इतर बाबींप्रमाणेच खाली दिल्यानुसार दोन टप्प्यांची आकडेमोड लागु होईलः
अ) पायरी-१-प्रत्येक संलेखाच्या राष्ट्रीय मुद्दल रकमेला खाली दिलेल्या टक्केवारीने गुणले जाते.

| मूळ परिपक्वता | रुपांतरण घटक |
|---|---|
| एक वर्षापेक्षा कमी | ०.५ % |
| एक वर्ष आणि दोन वर्षापेक्षा कमी | १.० % |
| प्रत्येक अतिरिक्त वर्षासाठी | १.० % |

ब) पायरी २- अशा प्रकारे मिळालेल्या मूल्याला, वरील १-अ मधील संबंधित प्रतिपक्षाला दिलेल्या जोखीम भाराने गुणले जाईल.

*सूचना - सध्या, बहुतेक प्राथमिक नागरी सहकारी बँका फोरेक्स व्यवहार करत नाहीत. तथापि, ज्यांना एडींचा परवाना दिला गेला आहे त्या बँका वर दिलेले व्यवहार करु शकतात. एखाद्या विशिष्ट व्यवहाराबाबत जोखीमभार देण्यात अनिश्चितता आल्यास, त्यासाठी आरबीआयकडून स्पष्टीकरण घेण्यात यावे.*

***************

**जोडपत्र - २**

**(अहवालांसाठी नमुना)(प्रोफॉर्मा फॉर रिटर्न्स)**
**(परिच्छेद ६ अनुसार)**

**भांडवली निधी, रिस्क ॲसेट्स/ एक्सपोझर्स आणि रिस्क ॲसेट रेशोचे विवरणपत्र**

**१) भाग अ - भांडवली निधी व रिस्क ॲसेट रेशो**

(रु.लाख)

| | |
|---|---|
| **१** | **भांडवली निधी** |
| अ | टियर १ भांडवल घटक |
| | अ) भरणा झालेले भांडवल |
| | वजाः अमूर्त ॲसेट्स व तोटे |
| | निव्वळ भरणा भांडवल |
| | ब) राखीव व अतिरिक्त निधी |
| | १) वैधानिक/अनिवार्य राखीव निधी |
| | २)भांडवली राखीव निधी (खालील टीपापहा) |
| | ३) इतर राखीव निधी |
| | ४) नफा-तोटा खात्यामधील अतिरिक्त निधी* |
| | एकूण राखीव व अतिरिक्त निधी |
| | एकूण भांडावली निधी (अ+ब) |
| *टीपाः- हयात, ॲसेट्सची विक्री दर्शविणारे आणि वेगळ्या खात्यात ठेवलेले भांडवली राखीव निधी समाविष्ट असतील.* | |
| *पुनर्मूल्यांकन राखीव निधी, कर्जांच्या तोट्याबाबत आणि इतर ॲसेट्सच्या तोट्याबाबत केलेल्या खास तरतुदी व सर्वसाधारण/तरत्या तरतुदी किंवा कोणत्याही ॲसेट्सच्या मूल्यामधील ऱ्हास ह्यांना टियर-१ भांडवली निधि समजले जाणार नाही.* | |
| * पीएडएल खात्यात अतिरिक्तता (ॲलोकेट न केलेली व एजीएमद्वारा अद्याप मंजुर न झालेली) आल्यास पुढील गोष्टी गृहीत धराव्यात-<br>अ) चालु वर्षाची अतिरिक्त रक्कम, बीओडीने शिफारस केल्यानुसार, निरनिराळ्या राखीव निधी/निधींमध्ये दाखवून व्यापारात ठेवण्यासाठी काढली जावी.<br>ब) जेथे बीओडीने ह्या अतिरिक्त रकमेचे वाटप ठरविले नसेल तेथे, गेल्या ३ वर्षांच्या सरासरीने ती काढण्यात यावी. | |
| **ब** | **टियर - २ भांडवल घटक** |
| १ | **अप्रकटिकृत राखीव निधी** |
| २ | पुनर्मूल्यांकन राखीव निधी |
| ३ | सर्वसाधारण तरतुदी व तोट्यांसाठी राखीव निधी # |
| ४ | गुंतवणुकीतील चढ उतारांसाठी राखीव निधी/निधी (फंड) |
| ५ | हायब्रिड कर्ज भांडवल संलेख |
| ६ | दुय्यमीकृत (सबॉर्डिनेटेड) कर्जे |
| | एकूण |
| | **(अ+ब) ची बेरीज** |

| | |
|---|---|
| # ह्यात स्टँडर्ड ॲसेट्सवरील सर्वसाधारण तरतुद समाविष्ट आहे (निर्बंध लागु) | |
| २ | **रिस्क ॲसेट्स** |
| अ | फंडेड रिस्क ॲसेट्सचे, म्हणजे, ताळेबंदावरील बाबींचे, तडजोड केलेले मूल्य (भाग 'ब' बरोबर पडताळण्यासाठी) |
| ब | नॉन फंडेड व ताळेबंदाबाहेरील बाबींचे तडजोड केलेले मूल्य (भाग 'क' बरोबर पडताळण्यासाठी) |
| क | एकूण-जोखीम भारित ॲसेट्स (अ+ब) |
| ३ | **भांडवली निधीचे जोखीम भारित ॲसेट्सशी टक्केवारी १/११X१००** |

## २. भाग ब - भारित ॲसेट्स, म्हणजे ताळेबंदावरील बाबी

| | पुस्तकी मूल्य | जोखीम भार | जोखीमीशी तडजोड केलेले मूल्य |
|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ६ |
| (१) रोकड व बँकेतील शिल्लक | | | |
| अ) प्रत्यक्षातील रोकड (विदेशी मुद्रातील नोटांसह) | | | |
| ब) भारतातील बँकांमधील शिल्लक | | | |
| १) आरबीआयमधील शिल्लक | | | |
| २) बँकांमधील शिल्लक | | | |
| १. चालु खाते (भारतात व भारताबाहेरील) | | | |
| २. इतर खाती (भारतात व भारताबाहेरील) | | | |
| ३. इतर प्राथमिक नागरी सहकारी बँकांमधील चालु खात्यातील शिल्लक | | | |
| (२) मनी ॲट कॉल ॲंड शॉर्ट नोटिस | | | |
| (३) गुंतवणुकी | | | |
| **अ)सरकारी व इतर परवानगीप्राप्त प्रतिभूती** | | | |
| **ब) इतर (ठेवलेल्या घसाऱ्याचे निव्वळ मूल्य)** | | | |
| **(४) अग्रिम राशी **** | | | |
| कर्जे व अग्रिम राशी, खरेदी केलेली व डिस्काउंट केलेली बिले व अन्य कर्जसुविधा | | | |
| अ) भारत सरकारने हमी दिलेला दावा/हक्क | | | |
| ब) राज्य सरकारने हमी दिलेला दावा/हक्क | | | |
| क) भारत सरकारच्या सार्वजनिक उपक्रमांवरील दावे | | | |
| ड) राज्य सरकारच्या पीएसयुवरील दावे | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| इ) इतर | | | |
| सूचनाः- १) केवळ ठेवींच्या स्वरुपातील रोख मार्जिन ठेवल्या गेलेल्या अग्रिम राशींसाठी व वाईट व शंकास्पद कर्जा बाबत घसाऱ्याची तरतुदी केली आहे अशा ॲसेट्सबाबतच नेटिंग केले जावे.<br>२) सबसिडिअरीज्, अमूर्त ॲसेट्स आणि टियर १ भांडवलातून वजा केलेल्या तोटे ह्यांना शून्य भार दिला जावा. | | | |
| (५) जागा/इमारत (ठेवलेल्या घसाऱ्याचे निव्वळ मूल्य) | | | |
| (६) फर्निचर व फिक्सचर्स | | | |
| (७) इतर ॲसेट्स (ब्रँच अँडजस्टमेंट्स, बँकिंग ॲसेट्स इत्यादीसह) | | | |
| * सरकारी व इतर परवानगीप्राप्त प्रतिभूतींमधील गुंतवणुकींच्या घसाऱ्यासाठी तरतुद केली असल्यास ती तळटीप देऊन निर्देशित करावी.<br>** वाईट व शंकास्पद कर्जांसाठी व स्टँडर्ड ॲसेट्ससाठी सर्वसाधारण किंवा विशिष्ट अशी तरतुद ठेवली असल्यास त्याबाबत तळटीप द्यावी. | | | |

**३. भाग ३ - भारित नॉनफंडेड एक्सपोजर्स/ताळेबंदाबाहेरील बाबी.**
**ताळेबंदाबाहेरील प्रत्येक बाब, खाली दिलेल्या नमुन्यात सादर करावी**

| बाबीचा प्रकार | पुस्तकी मूल्य | रुपांतर घटक | सममूल्य मूल्य | जोखीमभार | तडजोड केलेले मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**टीपः-** केवल रोख मार्जिन किंवा ठेवीं गहाणवट ठेवून दिलेल्या आणि वाईट व शंकास्पद कर्जांबाबतच्या घसाऱ्यासाठी तरतुद केलेल्या ॲसेट्ससाठी दिलेल्या अग्रिमराशी नेटिंग केले जावे.

**जोडपत्र-३**

## प्रिफरन्स शेअर्स देण्यासाठी प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांसाठी मार्गदर्शक तत्वे

### अ. परपेचुअल नॉन-क्युम्युलेटिव प्रिफरन्स शेअर्स(पीएनसीपीएस)

युसीबीज्, संबंधित रजिस्ट्रार/सेंट्रल रजिस्ट्रार ऑफ कोऑपरेटिव सोसायटीज् (आरसीएस/सीआरसीएस) ह्यांनी रिझर्व बँकेशी केलेल्या सल्लामसलतीनुसार दिलेल्या पूर्वपरवानगी, परपेचुअल नॉन क्युम्युलेटिव प्रिफरन्स शेअर्स (पीएनसीपीएस) देऊ शकतात. पीएनसीपीएस हे दर्शनी मूल्यावर दिले जावेत. पुढील अटी व शर्तींची पूर्तता केली गेली असलेल्या पीएनसीपीएसमधून उभारलेल्या रक्कमा टियर १ भांडवल म्हणून समजल्या जाण्यास पात्र असतील.

### २. देण्याच्या अटी

### २.१ मर्यादा

पीएनसीपीएसच्या थकबाकीची रक्कम ही टियर १ भांडवलात समावेश करण्यास पात्र आहे आणि ती कोणत्याही वेळी, पीएनसीपीएस वगळून एकूण टियर १ भांडवलाच्या २०% पेक्षा अधिक असू नये. वरील मर्यादा ही, गुडविल व इतर अमूर्त ॲसेट्स वजा केल्यानंतरच्या, परंतु गुंतवणुकी वजा करण्यापूर्वीच्या टियर १ भांडवलाच्या रकमेवर आधारित असेल.

### २.२ रक्कम

पीएनसीपीएस उभारण्याची रक्कम, त्या-त्या बँकांच्या संचालक मंडळाने ठरवावयाची आहे.

### २.३ परिपक्वता

हे पीएनसीपीएस निरंतर (परपेचुअल) असतील.

### २.४ पर्याय

१) पीएनसीपीएस, ‘‘पुट ऑप्शन’’ किंवा ‘‘स्टेप अप ऑप्शन’’ सह दिले जाणार नाहीत.
२) तथापि, बँका, एखाद्या विशिष्ट तारखेस, पुढील अटींवर कॉल ऑप्शनसह पीएनसीपीएस देऊ शकतातः-

अ) तो संलेख किमान दहा वर्षे चालला असल्यानंतरच त्या संलेखावर कॉल ऑप्शन देण्यास परवानगी आहे.

ब) केवळ भारतीय रिझर्व बँकेच्या (नागरी बँका विभाग) पूर्व परवानगीनेच कॉल ऑप्शन देता येईल. असा कॉल ऑप्शन देण्याबाबत बँकांकडून मिळालेल्या प्रस्तावांचा विचार करतेवेळी, रिझर्व बँक, इतर बाबींबरोबर, तो कॉल ऑप्शन देतेवेळी व दिल्यानंतर अशा दोन्हीही वेळी असलेला त्या बँकेचा सीआरएआर विचारात घेईल.

### २.५ ताळेबंदामधील वर्गीकरण

ह्या संलेखांचे वर्गीकरण ‘भांडवल’ म्हणून करण्यात येईल आणि ते ताळेबंदात वेगळे दाखविण्यात येईल.

### २.६ लाभांश

गुंतवणुकदारांना देय असलेल्या लाभांशाचा दर हा एक स्थिर दर किंवा बाजारानुसार ठरविल्या गेलेल्या रुपी इंटरेस्ट बेंचमार्क दराशी संबंधित असा तरता दर असेल.

**२.७ लाभांशाचे प्रदान**

अ) देणारी (प्रचालक) बँक, चालु वर्षाच्या उत्पन्नाच्या अतिरिक्त व वाटप करण्याजोगी रक्कम उपलब्ध असल्यास आणि पुढील बाबी असल्यास लाभांश प्रदान करील-

१) त्या बँकेचा सीआरएआर, रिझर्व बँकेने विहित केलेल्या निमायक आवश्यक तो पेक्षा अधिक असल्यास

२) असे प्रदान केल्यामुळे, परिणामी, त्या बँकेचा कॅपिटल टु रिस्क वेटेड ॲसेट रेशो, (सीआरएआर) रिझर्व बँकेने विहित केलेल्या निमायक आवश्यक तो पेक्षा कमी होणार नसल्यास.

३) लाभांश देताना, चालु वर्षाचा ताळेबंद कोणतेही संचित तोटे दाखवत नसल्याची खात्री करुन घेतल्यास.

ब) हा लाभांश संचयी (क्युम्युलेटिव) नसेल, म्हणजे, पुरेसा नफा उपलब्ध असल्यास व सीआरएआरचा स्तर किमान विनियामक असल्यासही, एका वर्षातील चुकलेला लाभांश पुढील वर्षांमध्ये दिला जाणार नाही. विहित दरापेक्षा कमी दराने लाभांश देला जाण्याचे प्रसंगी, पुरेसा नफा उपलब्ध असून व सीआरएआरचा स्तर किमान विनियामक स्तराएवढा असूनही, ही न दिलेली रक्कम भविष्यातील वर्षांमध्ये दिली जाणार नाही.
क) लाभांश न दिल्या जाण्याच्या/वरील अ मधील स्थितींमुळे कमी दराने लाभांश दिल्या जाण्याच्या घटना, प्रचालक बँकांनी, नागरी बँका विभागाचे प्रभारी महाव्यवस्थापक, केंद्रीय कार्यालय, भारतीय रिझर्व बँक, मुंबई ह्यांना कळवाव्यात.

क) वरील (अ) मधील अटींनुसार विहित केलेल्या दरापेक्षा कमी दराने दिलेल्या किंवा न दिलेल्या डिव्हिडंडची सर्व प्रकरणे, प्रचालन करणाऱ्या बँकांव्दारे, प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, नागरी बँका विभाग, केंद्रीय कार्यालय, भारतीय रिजर्व बँक, मुंबई ह्यांना कळविली जावीत.

**२.८ दाव्याचे अग्रक्रम**

पीएनसीपीएसच्या गुंतवणुकदारांच्या दाव्यांना, इक्विटी शेअर्स मधील गुंतवणुकदारांच्या दाव्यांपेक्षा अग्रक्रम दिला जाईल व इतर सर्व धनको व ठेवीदारांच्या दाव्यांना दुय्यम स्थान दिले जाईल.

**२.९ मतदानाचे हक्क**

पीएनसीपीएसमधील गुंतवणुकदार कोणत्याही मतदान-हक्कांसाठी पात्र नसतील.

**२.१० इतर अटी**

अ) पीएनसीपीएस हे संपूर्ण भरणा झालेले, अप्रतिभूतित व कोणत्याही निर्बंधक कलमांशिवाय असावेत.
ब) पीएनसीपीएसचा दर्जा त्यांच्या प्रचालकांच्या मतानुसार असेल.
क) पीएनसीपीएस देण्याबाबत, अन्य विनियामक प्राधिकरणांनी वैधानिक ठरविलेल्या अटी व शर्तींचे बँकांनी पालन करावे. मात्र त्यामुळे ह्या मार्गदर्शक तत्वांमधील अटी व शर्तींचे उल्लंघन होऊ नये. त्या संलेखाचा टियर १ भांडवलात समावेश करण्याबाबतच्या पात्रतेस दुजोरा मिळविण्यासाठी, वादाची कोणतीही घटना आरबीआयच्या नजरेस आणली जावी.

**३. राखीव निधी आवश्यकतांचे पालन**

अ) राखीव निधी आवश्यकता काढण्यासाठी, त्या इश्युसाठी गोळा केलेला आणि टियर १ प्रिफरन्स शेअर्स वाटपाचे निश्चितीकरण करण्यापूर्वी बँकेजवळ जमा असलेला निधी विचारात घ्यावा लागेल.

ब) तथापि, पीएनसीपीएसच्या इश्युमधून बँकेने उभा केलेला एकूण निधी हा, नक्त मागणी (नेट डिमांड) काढण्यासाठी दायित्व/जबाबदारी तसेच राखीवनिधी आवश्यकतांसाठी काल-दायित्व काढण्यासाठी समजला जाणार नाही व त्यामुळे त्याला सीआरआर/एसएलआर आवश्यकता लागु होणार नाहीत.

**४. अहवाल पाठविण्याच्या आवश्यकता**

पीएनसीपीएस देणाऱ्या बँकांनी, प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, नागरी बँका विभाग, भारतीय रिझर्व बँक मुंबई, ह्यांचेकडे, उभे केलेले भांडवल, वर विहित केल्याप्रमाणे त्या प्रचालनाबाबतच्या अटी व शर्ती व ऑफर डॉक्युमेंटची प्रत, हे कागदपत्र तो इश्यु पूर्ण झाल्यावर लगेच पाठविणे आवश्यक आहे.

**५. युसीबीज्नी दिलेल्या परपेच्युअल नॉन क्युम्युलेटीव प्रिफरन्स शेअर्समध्ये वाणिज्य बँकांनी केलेली गुंतवणुक**

अ) वाणिज्य बँका, युसीबीज्नी दिलेल्या पीएनसीपीएसमध्ये, अनलिस्टेड सिक्युरिटीजमध्ये १०% सीलींग दरम्यान किंवा रिझर्व बँकेच्या डिपार्टमेंट ऑफ बँकिंग ऑपरेशन्स अँड डेव्हलपमेंट (डीबीओडी), सेंट्रल ऑफिस ह्यांनी विहित केल्यानुसार गुंतवणुक करु शकतात. मात्र ते पीएनसीपीएस रेटेड असले पाहिजेत.

ब) युसीबींनी दिलेल्या पीएनसीपीएसमधील गुंतवणुकींना, कॅपिटल ॲडेक्वसीसाठी, डीबीओडीने विहित केलेले जोखीमभार लागु होतील.

**६. टियर १ प्रिफरन्स शेअर्समध्ये गुंतवणुक/त्याविरुध्द अग्रिम राशी देणे**

युसीबींनी इतर बँकांच्या पीएनसीपीएसमध्ये गुंतवणुक करु नये. तसेच त्यांनी किंवा अन्य बँकांनी दिलेल्या पीएनसीपीएसच्या प्रतिभूतींवर अग्रिम राशीही देऊ नयेत.

**७. शेअर लिंकिंग नॉर्म्स**

विद्यमान शेअर लिंकिंग नॉर्म्सच्या अनुपालनासाठी, धारण केलेल्या पीएनसीपीएसना शेअर्स समजले जाते.

**ब) परपेचुअल क्युम्युलेटिव प्रिफरन्स शेअर्स (पीसीपीएस)/रिडीमेबल नॉन-क्युम्युलेटिव प्रिफरन्स शेअर्स (आरएनसीपीएस)/रिडीमेबल क्युम्युलेटिव प्रिफरन्स शेअर्स.**

**१) प्रचालनाच्या अटी**

युसीबींद्वारे वरील पीसीपीएस/आरएनसीपीएस/आरसीपीएस, संबंधित रजिस्ट्रार/सेंट्रल रजिस्ट्रार ऑफ कोऑपरेटिव सोसायटीज (आरसीएस/सीआरसीएस) ह्यांनी रिझर्व बँकेशी सल्लामसलत करुन दिलेल्या परवानगीनुसार दिले जाऊ शकतात. ह्या तीनही संलेखांना एकत्रितपणे टियर २ प्रिफरन्स शेअर्स म्हणून संबोधिले जाईल. हे टियर २ प्रिफरन्स शेअर्स दर्शनी मूल्यावर दिले जावेत. पुढील अटी व शर्तीचे पालन करणाऱ्या टियर २ प्रिफरन्स शेअर्समधून उभी केलेली रक्कम, उपर टियर २ भांडावल म्हणून समजण्यास पात्र ठरेल.

**२.१ संलेखांचे गुणविशेष**

टियर २ प्रिफरन्स शेअर्स हे परपेचुअल (पीसीपीएस) किंवा दिनांकित (आरएनसीपीएस व आरसीपीएस) असे व किमान १५ वर्षांची स्थिर परिपक्वता असलेले संलेख असू शकतील.

**२.२ मर्यादा**

कोणत्याही वेळी, ह्या संलेखांच्या थकबाकीची व टियर २ भांडवलाच्या घटकांची रक्कम ही टियर १ भांडवलाच्या १००% पेक्षा अधिक नसावी. वरील मर्यादा, गुडविल व इतर अमूर्त ॲसेट्स वजा केल्यावर, परंतु गुंतवणुकी वजा करण्यापूर्वी आलेल्या टियर १ भांडवलाच्या रकमेवर आधारित असेल.

### २.३ रक्कम

उभी करावयाची रक्कम बँकांच्या संचालक मंडळाने ठरवावी.

### २.४ पर्याय

१) हे संलेख "पुट ऑप्शन" सह दिले जाणार नाहीत.
२) तथापि, पुढील अटींचे काटेकोरपणे पालन केले गेल्यास, एखाद्या विशिष्ट तारखेचा कॉल ऑप्शन देऊन, बँका हे संलेख देऊ शकतातः-
अ) तो संलेख किमान दहा वर्षे चालु ठेवला असल्यानंतरच त्या संलेखावर कॉल ऑप्शन देण्यास परवानगी आहे.
ब) केवळ भारतीय रिझर्व बँकेच्या (नागरी बँका विभाग) पूर्व मंजुरीनेच असा कॉल ऑप्शन देता येईल. कॉल ऑप्शन देण्याबाबत बँकांकडून आलेल्या प्रस्तावांचा विचार करताना, रिझर्व बँक, इतर बाबींबरोबर, तो कॉल ऑप्शन देतेवेळी व कॉल ऑप्शन दिल्यानंतर असलेली बँकेची सीआरएआर स्थिती विचारात घेईल.

### २.५ स्टेप-अप पर्याय

प्रचालक बँक, त्या संलेखाच्या संपूर्ण आयुष्यात एकदाच, कॉल ऑप्शनला जोडून, प्रचालनाच्या तारखेपासून दहा वर्षे उलटल्यावर, स्टेप अप पर्याय देऊ शकते. असा स्टेप-अप १०० बीपीएसपेक्षा अधिक नसावा. स्टेप-अपवर असलेल्या मर्यादा, प्रचालक बँकेला असलेल्या कर्जाच्या सर्वंकष मूल्याला लागु होतात.

### २.६ ताळेबंदातील वर्गीकरण

ह्या संलेखांचे वर्गीकरण "कर्जे" असे केले जाईल व ते ताळेबंदावर निराळे दाखविले जाईल.

### २.७ कुपन

गुंतवणुकदारांना द्यावयाचे कुपन हे एखाद्या स्थिर दरावर किंवा बाजार निश्चित रुपी इंटरेस्ट बेंचमार्क दराशी संबंधीत अशा तरत्या दरावर दिले जाऊ शकते.

### २.८ कुपनचे प्रदान

२.८.१ केवळ पुढील बाबींसंबंधातच कुपन-प्रदान करता येईलः

अ) त्या बँकेचा सीआरएआर हा रिझर्व बँकेने विहित केलेल्या किमान विनियामक आवश्यकतांपेक्षा अधिक असल्यास.
ब) अशा प्रदानामुळे, परिणामी, त्या बँकेचा सीआरएआर, विनियामक आवश्यकतांपेक्षा खाली येणार अथवा राहणार नसल्यास.
क) त्या बँकेला निव्वळ/नक्त तोटा झाला नसावा. ह्यासाठी, निव्वळ तोट्याची व्याख्या म्हणजे (१) मागील आर्थिक वर्षाच्या अखेरीस असलेला संचयित तोटा किंवा (२) चालु आर्थिक वर्षात झालेला तोटा.
ड) पीसीपीएस व आरपीसीएसच्या बाबतीत, प्रदान न केलेले/अशतः प्रदान केलेले कुपन हे एक दायित्व समजले जाईल. देय असलेले व न दिले गेलेले व्याज हे नंतरच्या वर्षांमध्ये देण्यास परवानगी दिली जाऊ शकते. मात्र त्या बँकेने वरील आवश्यकतांची पूर्तता केली असली पाहिजे.
ई) आरएनसीपीएसच्या बाबतीत, पुरेसा नफा उपलब्ध असूनही आणि सीआरएआरचा स्तर विनियामक किमान असला तरीही, डिफर्ड कुपनचे प्रदान भावी वर्षांमध्ये करता येणार नाही. तथापि, पुरेसा नफा उपलब्ध असल्यास व सीआरएआरचा स्तर विनियामक किमान असल्यास, बँका, विहित दरापेक्षा कमी दराने कुपनचे प्रदान करु शकतात.

२.८.२ व्याज न दिल्याची/विहित दरापेक्षा कमी दराने व्याज दिल्याची सर्व प्रकरणे, देण्याऱ्या बँकांनी, प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, नागरी बँका विभाग, केंद्रीय कार्यालय, भारतीय रिझर्व बँक, मुंबई, ह्यांना कळवाव्यात.

**२.९ अपर टियर २ मध्ये समाविष्ट असलेल्य रिडीमेबल प्रिफरन्स शेअर्सचे विमोचन/पुनर्प्रदान**

ह्या संलेखांचे, परिपक्वतेनंतर करावयाचे विमोचन, इतर बाबींबरोबर पुढील अटींवर, केवळ रिझर्व बँकेच्या (नागरी बँका विभाग) पूर्व मंजुरीनेच करता येईलः

अ) त्या बँकेचा सीआरएआर हा रिझर्व बँकेने विहित केलेल्या किमान विनियामक आवश्यकतांपेक्षा अधिक असल्यास.
ब) अशा प्रदानामुळे, परिणामी, त्या बँकेचा सीआरएआर, विनियामक आवश्यकतांपेक्षा खाली येणार अथवा राहणार नसल्यास.

**२.१० दाव्याचा अग्रक्रम**

ह्या संलेखांमधील गुंतवणुकदारांच्या दाव्यांना, टियर १ भांडवलात समावेश करण्यास पात्र असलेल्या संलेखातील गुंतवणुकदारांच्या दाव्यांपेक्षा अग्रक्रम/प्राधान्य दिले जाईल. आणि निम्न टियर २ मधील धनकोंसह अन्य धनकोंच्या व ठेवीदारांच्या दाव्यांपेक्षा दुय्यम समजले जातील. उच्चतर टियर २ मध्ये समाविष्ट संलेखांच्या गुंतवणुकदारांमध्ये हे दावे एकमेकांसाठी समान स्तरांवर असतील.

**२.११ मतदानाचे हक्क**

टियर २ प्रिफरन्स शेअर्स मधील गुंतवणुकदार कोणत्याही मतदान हक्कासाठी पात्र नसतील.

**२.१२ सीआरएआर काढण्यासाठी कर्जफेडीची तरतुद**

टियर २ भांडवलात समावेश होण्यासाठी, रिडीमेबल प्रिफरन्स शेअर्सना, (क्युम्युलेटिव व नॉन क्युम्युलेटिव दोन्हीही) कॅपिटल ॲडेक्वसीसाठी, त्यांच्या कार्यकालमधील पाच वर्षांच्या कालात, त्यांचा परिपक्वताकाल जवळ येत असताना, खाली दिलेल्या कोष्टकानुसार डिसकाउंटला सामोरे जावे लागेल.

| **संलेखांची उर्वरित परिपक्वता** | **डिसकाउंटचा दर (%)** |
|---|---|
| एक वर्षापेक्षा कमी | १०० |
| एक वर्ष व अधिक पण दोन वर्षापेक्षा कमी | ८० |
| दोन वर्ष व अधिक पण तीन वर्षापेक्षा कमी | ६० |
| तीन वर्ष व अधिक पण चार वर्षापेक्षा कमी | ४० |
| चार वर्ष व अधिक पण पाच वर्षापेक्षा कमी | २० |

**२.१३ इतर अटी**

अ) हे टियर २ प्रिफरन्स शेअर्स, संपूर्ण भरणा झालेले, अप्रतिभूतित व कोणत्याही निर्बंधात्मक कलमांशिवाय असवेत.
ब) ह्या टियर २ प्रिफरन्स शेअर्सचे रेटिंग प्रचालकाच्या इच्छेनुसार करता येऊ शकते.

क) टियर २ प्रिफरन्स शेअर्स देण्यासंबंधाने, बँकांनी, इतर विनियामक प्राधिकरणांनी अनिवार्य ठरविलेल्या अटी व शर्तींचे पालन केलेले असावे. मात्र त्यात, ह्या मार्गदर्शक तत्वामध्ये विहित केलेल्या कोणत्याही अटी व शर्तींचे उल्लंघन केले जाऊ नये. वादाची कोणतीही घटना, तो संलेख टियर २ भांडवलात समाविष्ट करण्याबाबतच्या पात्रतेची खात्री करुन घेण्यासाठी माहिती मिळविण्यास आरबीआयच्या नजरेस आणावी.

**३. राखीव निधीच्या आवश्यकतांचे अनुपालन**

अ) राखीव निधीची आवश्यकता काढण्यासाठी, बँकेने गोळा केलेला आणि ह्या संलेखांचे वाटप निश्चित करण्यापूर्वी बँकेने ठेवलेला निधी विचारात घ्यावा लागेल.
ब) हे संलेख देऊन बँकेने उभा केलेला निधी हा नेट डिमांड काढण्यासाठी दायित्व म्हणून समजला जाईल, तसेच राखीव निधी आवश्यकतांसाठी काल दायित्व समजला जाईल व त्यामुळे त्याला सीआरआर/एसएलआर आवश्यकता लागु होतील.

**४. अहवाल पाठविण्याच्या आवश्यकता**

हे संलेख देणाऱ्या युसीबींनी, उभे केलेले कर्ज, वर विहित केलेल्या इश्युच्या अटी व शर्ती ह्याबाबतची माहिती आणि ऑफर डॉक्युमेंटची प्रत, प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, नागरी बँका विभाग, भारतीय रिझर्व बँक, मुंबई ह्यांना तो इश्यु पूर्ण झाल्यावर पाठविणे आवश्यक आहे.

**५. युसीबींनी देलेल्या टियर २ प्रिफरन्स शेअर्समधील वाणिज्य बँकांची गुंतवणुक**

अ) वाणिज्य बँका, युसीबींनी देलेल्या टियर २ प्रिफरन्स शेअर्समध्ये अनलिस्टेड सिक्युरिटीज्च्या १०% मर्यादित किंवा डिपार्टमेंट ऑफ बँकिंग ऑपरेशन्स अँड डेव्हलपमेंट (डीबीओडी), केंद्रीय कार्यालय, भारतीय रिझर्व बँक ह्यांनी विहित केल्यानुसार गुंतवणुक करु शकतात. मात्र असे शेअर्स रेटेड असले पाहिजेत.
ब) टियर २ प्रिफरन्स शेअर्समधील गुंतवणुकींना, कॅपिटल ॲडेक्वसीसाठी, डीबीओडीने विहित केल्यानुसार जोखीमभार लागु होतील.

**६. ह्या संलेखांमधील गुतवणूक/ त्यांच्याविरुध्द अग्रिमराशी**

अन्य बँकांनी प्रचालित केलेल्या टियर २ प्रिफरन्स शेअर्समध्ये युसीबींनी गुंतवणुक करु नये तसेच त्यांनी किंवा अन्य बँकांनी दिलेल्या टियर २ प्रिफरन्स शेअर्सविरुध्द अग्रिमराशीही देऊ नयेत.

**जोडपत्र - ४**

## दीर्घ मुदतीच्या ठेवी देण्याबाबत, प्राथमिक (नागरी) सहकारी बँका (युसीबीज्) साठी मार्गदर्शक तत्वे.

### १) देण्याची मुदत

संबंधित रजिस्ट्रार/सेंट्रल रजिस्ट्रार ऑफ कोऑपरेटिव सोसायटिज (आरसीएस/सीआरसीएस) ह्यांनी रिझर्व बँकेच्या सल्लयाने दिलेल्या पूर्व परवानगीने युसीबीज् दीर्घ मुदतीच्या ठेवी देऊ शकतात. अशा एलटीडी, सभासद असलेल्या व नसलेल्यांना आणि संबंधित युसीबीच्या कार्यक्षेत्रा बाहेर असलेल्यांनाही देता येऊ शकतात. दीर्घ मुदतीच्या ठेवी देण्याबाबत विद्यमान भागधारकांवर कोणतीही मनाई नाही. पुढील अटी व शर्तीचे केलेल्या, एलटीडीमधून उभ्या केलेल्या रकमा निम्न टियर २ भांडवल म्हणून समजण्यास पात्र असतील.

### २.१ परिपक्वता

एलटीडीसाठी असलेली किमान परिपक्वता ५ वर्षांपेक्षा कमी नसावी.

### २.२ मर्यादा

टियर २ भांडवल म्हणून समजण्यास पात्र असलेली, एलटीडीची येणे असलेली रक्कम ही टियर १ भांडवलाच्या ५० टक्क्यांपर्यंत मर्यादित असेल. वरील मर्यादा, टियर १ भांडवलातून गुडविल व इतर अमूर्त ॲसेट्स वजा करुन आलेल्या, परंतु सबसिडिअरिजमधून इक्विटी गुंतवणुकी वजा करण्यापूर्वी असलेल्या रकमेवर आधारित असेल.

### २.३ रक्कम

उभी करावयाची रक्कम बँकांच्या संचालक मंडळाने निश्चित करावी.

### २.४ दाव्यांचा अग्रक्रम

ठेवीदार व अन्य धनको ह्यांचुआ दाव्यांपेक्षा एलटीडींना दुय्यम स्थान असेल, परंतु शेअर होल्डर्स, प्रिफरन्स शेअर्स धारक (टियर १ व टियर २ दोन्हीही) ह्यांच्या दाव्यांपेक्षा अग्रक्रमाचे असतील. निम्न टियर २ मध्ये समाविष्ट असलेल्या संलेखांच्या गुंतवणुकदारांमध्ये हे दावे एकमेकांशी समान स्तरावर असतील.

### २.५ पर्याय

अ) एलटीडी, ‘पुट ऑप्शन’ किंवा ‘स्टेप ऑप्शनसह’ दिले जाणार नाहीत.

ब) हा “कॉल ऑप्शन”, रिझर्व बकेची पूर्वपरवानगी घेऊन व ५ वर्षांनंतरच देता येईल. असा कॉल ऑप्शन देण्याबाबत बँकांकडून आलेल्या प्रस्तावांचा विचार करताना, रिझर्व बँक,इतर बाबींबरोबर, तो कॉल ऑप्शन देण्यापूर्वी तसेच दिल्यानंतर बँकेची सीआरआर स्थिती विचारात घेईल.

### २.६ विमोचन/पूर्वप्रदान

परिपक्व झाल्यावर एलटीडींचे पुनर्प्रदान, केवळ भारतीय रिझर्व बँकेच्या (नागरी बँका विभाग, केंद्रीय कार्यालय) मंजुरीने व इतर बाबींसह पुढील अटींवरच करता येईलः-

१) त्या बँकेचा सीआरएआर, रिझर्व बँकेने विहित केलेल्या किमान विनियामक आवश्यकतेपेक्षा अधिक असला पाहिजे.
२) असे पुनर्प्रदान केल्यामुळे, परिणामी, त्या बँकेचा सीआरएआर, रिझर्वबँकेने विहित केलेल्या किमान विनियामक आवश्यकतेपेक्षा खाली पडू किंवा राहू नये.

**२.७ व्याजदर**

एलटीडींचा व्याजदर हा स्थिर व्याजदर किंवा बाजार निर्धारित रुपी इंटरेस्ट बेंचामार्क दराशी संबंधित तरता दर असू शकतो

**२.८ डीआयजीसी संरक्षण**

एलटीडी, डीआयजीसी संरक्षणासाठी पात्र नाही.

**२.९ वर्धमान सूट (प्रोग्रोसिव डिस्काउंट)**

कॅपिटल ॲडेक्वसीसाठी ह्या ठेवींना खाली दिल्याप्रमाणे डिस्काउंट लागु होईल.

| उर्वरित परिपक्वता काल | डिसकाउंटचा दर |
|---|---|
| एक वर्षापेक्षा कमी | १००% |
| एक वर्षापेक्षा अधिक पण दोन वर्षापेक्षा कमी | ८०% |
| दोन वर्षापेक्षा अधिक पण तीन वर्षापेक्षा कमी | ६०% |
| तीन वर्षापेक्षा अधिक पण चार वर्षापेक्षा कमी | ४०% |
| चार वर्षापेक्षा अधिक पण पाच वर्षापेक्षा कमी | २०% |

**२.१० ताळेबंदामधील वर्गीकरण**

ह्या संलेखांचे वर्गीकरण "कर्जे (बॉरेईंगज)" असे केले जाईल व ते ताळेबंदात वेगळे दाखविले जातील.

**३. राखीव निधीची आवश्यकता**

एलटीडीद्वारे बँकेने उभी केलेली एकूण रक्कम ही, राखीव निधी आवश्यकतांसाठी, (सीआरआर व एसएलआर) नेट डिमांड व टाईम लायाबिलिटीज् काढण्यासाठी एक दायित्व म्हणून समजली जातील.

**४. अहवाल पाठविण्याच्या आवश्यकता**

अशा दीर्घ मुदतीच्या ठेवी देणाऱ्या बँकांनी, उभ्या केलेल्या ठेवी, वर विहित केल्यानुसार प्रचालनाच्या अटी ह्यांच्या माहितीसह, प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, नागरी बँका विभाग, भारतीय रिझर्व बँक, मुंबई ह्यांना त्याबाबतचा अहवाल सादर करावयाचा आहे.

**५.एलटीडी मध्ये गुंतवणुक/त्याविरुध्द अग्रिम राशी देणे**

युसीबींनी अन्य युसीबींच्या एलटीडीमध्ये गुंतवणुक करु नये. तसेच त्यांनी दिलेल्या किंवा इतर बँकांनी देलेल्या एलटीडीच्या प्रतिभूतीविरुध्द अग्रिम राशी देऊ नयेत.

**परिशिष्ट**

**ह्या महापरिपत्रकात समाविष्ट केलेल्या परिपत्रकांची यादी**

| क्र | परिपत्रक | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र. ४९/०९.१४.०००/ २०१०-११ | २४.०५.२०११ | ग्रॅच्युईटी मर्यादेतील वाढ – प्रुडेंशियल ट्रीटमेंट |
| २ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र. २२/०९.१८.२०१/ २०१०-११ | १५.११.२०१० | नागरी सहकारी बँकांमधील बॉरोईंग नॉर्म्सशी शेअर जोडणी |
| ३ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र. ४२/०९.११.६००/ २००९-१० | ०८.०२.२०१० | बाजार जोखीमांसाठी भांडवली आकारांवरील प्रुडेंशियल मार्गदर्शक तत्वे |
| ४ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र. ३०/०९.१४.०००/२००८-०९ | १६.१२.२००९ | लोन पोर्ट फोलियोज बाबतच्या निरनिराळ्या प्रकारच्या तरतुदींबाबत प्रुडेंशियल ट्रीटमेंट |
| ५ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र. २४/०९.१८.२०१/२००९-१० | २७.११.२००९ | दीर्घ मुदतीच्या ठेवींचे पुनर्नामांकन |
| ६ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र.७३/०९.१४.०००/२००८-०९ | २९.०६.२००९ | लोन पोर्टफोलिओजच्या बाबतीत निरनिराळ्या प्रकारच्या तरतुदींसाठी प्रुडेन्शियल ट्रीटमेंट |
| ७ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र.६१/०९.१८.२०१/२००८-०९ | २१.०४.२००९ | भांडवली निधी वाढविण्यासाठी संलेख. |
| ८ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र.३२/०९.१८.२०१/२००८-०९ | १३.०१.२००९ | भांडवली निधी वाढविण्यासाठी संलेख. |
| ९ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र.२९/०९.११.६००/२००८-०९ | ०१.१२.२००८ | प्रुडेन्शियल नॉर्म्सचे पुनरावलोकनः- कमर्शियल रियल इस्टेट आणि एनबीएफसी ह्यांच्या जोखमींसाठी स्टँडर्ड ॲसेट्स व रिस्क वेट्सबाबत तरतुद |
| १० | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र.४/०९.१८.२०१/२००८.-०९ | १५.०७.२००८ | भांडवली निधी वाढविण्यासाठी संलेख. |
| ११ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र.५३/१३.०५.०००/०७-०८ | १६.०६.०८ | रहिवासी मालमत्तेने प्रतिभूतित दावेः जोखीम भारांसाठी मर्यादित बदल. |
| १२ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र.३१/०९.११.६००/०७-०८ | २९.०१.०८ | कॅपिटल ॲडेक्वसीसाठी प्रुडेन्शियल नॉर्म्सः- शैक्षणिक कर्जांसाठी जोखीम भार. |
| १३ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र.४० /१३.०५.००० / २००६-०७ | ०४.०५.०७ | सन २००७-०८ साठी वार्षिक धोरण निवेदन- रहिवासी गृह कर्ज-जोखीम भार कमी करणे. |
| १४ | युबीडी (पीसीबी).सीआयआर क्र. ३९ / १३.०५.००० | ३०.०४.०७ | सन २००७-०८ साठी वार्षिक धोरण निवेदन- सोने-चांदी विरुध्द कर्जे-जोखीम भारात घट. |
| १५ | युबीडी(पीसीबी).सीआयआर क्र.३०/०९.११.६००/०६-०७ | १९.०२.०७ | २००६-०७ सालासाठी, नाणेविषयक धोरणावरील वार्षिक धोरणाच्या तिसऱ्या तिमाहीचे पुनरावलोकन -स्टँडर्ड ॲसेट्ससाठी तरतुद करणे. |
| १६ | युबीडी.बीडीपी.सीआयआर क्रः७/०९.२९.०००/२००६-०७ | १८.०८.०६ | केंद्र सरकारच्या प्रतिभूतींमधील “व्हेन इश्युड” व्यवहार-लेखा व संबंधित बाबी |
| १७ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र.५५/०९.११.६००/०५-०६ | ०१.०६.०६ | २००६-०७ सालाचे वार्षिक धोरणा निवेदनः- कमर्शियल रियल इस्टेटच्या जोखमींवरील |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | जोखीम भार. |
| १८ | युबीडी. (पीसीबी). बीडीपी. सीआयआर क्र. ४६ / १३.०५.००० / २००५-०६ | १९.०४.०६ | एलसीखाली डिसकाउंट केलेली बिलेः- जोखीम भार व एक्सपोझर नॉर्म्स |
| १९ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र.९/१३.०५.००/०५-०६ | ०९.०८.०५ | कॅपिटल मार्केट एक्सपोझरसाठी जोखीम भार |
| २० | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र.८/०९.११६.००/०५-०६ | ०९.०८.०५ | कॅपिटल ॲडेक्वसीवरील प्रुडेन्शियल नॉर्म्स-गृहवित्त/कमर्शियल रियल इस्टेट एक्सपोझर्सवरील जोखीमभार |
| २१ | युबीडी.डीबीस.सीआयआर/क्र.४४/१३.०५.००/०४-०५ | १५.०४.०५ | अग्रिम राशींवरील कमाल मर्यादा-कर्जदार व्यक्ति/गट ह्यांच्याबाबत एक्सपोजर्स |
| २२ | युबीडी.पीसीबी.सीआयआर३३ / ०९.११६.०० / २००४ | ०५.०१.०५ | गृहवित्त व उपभोक्ता कर्जवरील जोखीम भार |
| २३ | युबीडी.पीसीबी.सीआयआर२६/०९.१४०.००/२००४-०५ | ०१.११.०४ | प्रुडेन्शियल नॉर्म्स-राज्य सरकारने हमी देलेले एल्सपोझर्स |
| २४ | युबीडी .क्र.बीडीपी.पीसीबी.सीआयआर५२/०९.११६.००/२००३- | १५.०६.०४ | सार्वजनिक वित्त संस्थांच्या (पीएफआय) एक्सपोझर्ससाठी जोखीमभार |
| २५ | युबीडी .क्र.बीडीपी.पीसीबी.सीआयआर ३७/१३.०५.००/०३- | १६.०३.०४ | बॅंकांद्वारे बिलांचे डिस्काउंटिंग/ रिडिस्काउंटिग केले जाण्याबाबत |
| २६ | युबीडी .क्र.बीडीपी.पीसीबी.सीआयआर३४/१३.०५.००/२००३-०४ | ११.०२.०४ | अग्रिम राशींवरील कमाल मर्यादा-कर्जदार व्यक्ती/गट ह्याबाबतचे एक्सपोझसर भांडवली निधी काढणे. |
| २७ | युबीडी.क्र.पीओटी.पीसीबी.सीआयआर१८/०९.२२.०१/२००२०३ | ३०.०९.०२ | गृहवित्तावरील जोखीम भार |
| २८ | युबीडी.क्र.पीओटी.पीसीबी.सीआयआर क्र.४५/०९.११६.००/२०० | २५.०४.०१ | नागरी(प्राथमिक) सहकारी बॅंकांना, कॅपिटल ॲडेक्वसी नॉर्म्स लागु करणे. |